# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २३/०४/२०२४

➢ पळवुन नेणे :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो. स्टे खोलापुरी गेट ११६/२०२४ कलम ३६३ भा.द.वी | अमरावती | घटना ता वेळी २२.०४.२०२४ चे १४.०० वा दाखल ता वेळ २२.०४.२०२४ चे २३.२९ वा | पिडीत मुलीचे वडील | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी ची मुलगी वय १७ वर्ष ही नमुद घटना ता वेळी व ठिकाणी मेहंदी क्लास करण्या करीता नेहमी प्रमाणे गेली क्लास नेहमी प्रमाणे ०३.०० वा संपते परंतु दुपारी ०४.३० वा पर्यांत घरी परत आली नाही म्हणुन फिर्यादी हे तिला पाहण्याकरीता तिच्या क्लास वर गेले व विचारपुस केली असता त्यांनी असे सांगीतले की काही मुली लग्ना मध्ये मेहंदी लावण्या करीता गेल्या आहे त्यानंतर फिर्यादी हे घरी आले परत फोन वर मॅडमला विचारले असता त्यांनी सांगीतले की तुमची मुलगी दुपारी ०३.०० वाजताच घरी गेली असे म्हटले म्हणुन फिर्यादीने तिच्या मैत्रीना व नाते वाईकांना व बस स्टॅन्ड रेल्वे स्टेशन शोध घेतला तरी ती आता पर्यंत मिळुन आली नाही . अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा कल् ३६३ भा.द.वी प्रमाणे दाखल |

➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | बडनेरा अप क्र २८९/२४ कलम ४५७, ३८० भादवी | बडनेरा | घ ता वेळ -दि. २१/४/२०२४ चे २०.०० ते दि. २२/०४/२४ चे ०६.०० वा दरम्यान दा ता वेळ - दि. २२/४/२४ चे १६.१३ वा | एक महिला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी मलकापुर येथील जि.प शाळेतील स्वंयमपाक खोलीचे गेट चे कुलुप तोडुन त्यातील पितळी कोठी वजन अं. २० किलो उंची अं. साडेतिन फुट कि अं. ३५००/- रु ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली व त्यातील अग्निशामक सिलेंडर त्याचे शाळेतील ६ व्या वर्गात निवुन ठेवले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पोस्टे वलगाव अपराध क्र. - 33/2024 कलम 380 भा.द.वि. | ग्राम सिकची रिसॉर्ट वलगाव ता.जि. अमरावती | 21/04/2024 सकाळी 11/00 ते दुपारी 16/30 वा दरम्यान. 22/04/2024 01/11 वा | प्रकाश सोहनलाल मुदडा वय 51वर्ष धंदा वकील रा. लायविश विला धारिवाल सोसायटी यवतमाल शहर ता. जि. यवतमाळ | अज्ञात ईसम | हकिकत अशा प्रकारे आहे कि,दि. 21/04/2024 रोजी सिकची रिसॉर्ट वलगाव येथे लग्न असल्याने मी माझे परिवारासह सिकची रिसॉर्ट वलगाव येथे 19/04/2024 रोजी दुपारी 12/00 वा राहण्यास आलो. तेव्हा सदर रिसॉर्टच्या रुम क्र,101 सेवासदन पहीला मजला मधेये माझी पत्नी, वहीणी, व पुतनी अशा त्याचे कडे असणारे कपडे दागीने असे सामाणासह सदर रुम मध्ये राहील्या तर मी रुम क्र. 101 ईतर नातेवाईका सोबत राहीलो होतो. माझे पत्नीने लग्नासाठी तीचे दागीने घेतलेले होते. ते तीने तीचे रुम मध्ये ठेवलेले होते. माझे काकाचे मुलीचे लग्न आम्ही राहत असलेल्या रिसॉर्ट चे जवळ असणारे रॉयल पॅलेस हॉलमध्ये असल्याने आम्ही सर्वजण साधारण 11/00 वा चे सुमारास तेथे गेलो. साधारण दुपारी 04/30 वा. चे सुमारास माझी पत्नी आली व तिने सॉंगीतले की , तीने रुम क्र. 101मध्ये ठेवलेले सोन्याच्या दोन बागड्या व चांदीचा चौपर हार दिसुन येत नाही. तेव्हा मी व नातेवाईकांनी ती रुम तपासणी केली असता ते मिळुन आले नाही .तेव्हा माझी खात्री पटली की , सदर दागीने कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरी केले आहे .माझे पत्नीचे चेरी झालेल्या दागीण्याचे वर्णन व अं. की. खालील प्रमाणे 1) जुन्या वापरत्या 11तोळे वजणाच्या दोन सोण्याच्या बागड्या ............अं.कि. 5,50,000/- रुपये 2) जुने वापरते 01तोळा गोल्ड |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पॉलिश केलेले चांदीचे चौपर हार ..........अं. कि. 10,000/- रुपये एकुण अंदाजे किंमत 5,60,000/- रुपये तरी मी माझी चोरिस गेलेली दागीने पुन्हा पाहीली तर ती ओवखेन तरी माझे पत्नीचे वर नमुद वर्णनाचे व किमतीचे दागीने चोरी करणारे अज्ञात ईसमा विरोधात माझी तक्रार आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अम शहर अप क्र ३९४/२०२४ कलम २७९,३३८ भादवि सहकलम १३४ मो. वाहन कायदा | आशियाना क्लब चे चौकात अमरावती | दि.२१/०४/२०२४ चे ०९.०० वा. ते ०९.१५ वा दरम्याण<br><br>दि.२२/०४/२०२४ चे २०.१९ वा. | राजु मदन गौरवे वय ४८ वर्ष व्यवसाय मजुरी, रा. फ्रेजरपुरा हिन्दु स्मशान भुमी समोर जुना बायपास रोड अमरावती | होन्डा सिटी लाईट ब्राऊन रंगाची फोरव्हिलर क्र MH 27 DE 2916 चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे नमुद घटना ता वेळी चपराशीपुरा येथे पुतण्या नामे अमीर गौरवे याची हिरो होन्डा सी डी डिलक्स मो सा क्र MH २७ DB १८२२ ने सामान आनने करीता गेले व घरी परत येत असताना आशियाना क्लबचे चौकातील कॉर्नररवर कॉंग्रेस नगर कडुन येणारी फोरव्हिलर वाहन क्र MH 27 DE 2916 चा चालक हा बायपास कडुन विटा भट्टी कडे जात असता रोडवर फिर्यादीस ठोस मारल्याने फिर्यादी मोटार सायकल सह खाली पडले त्यामुळे फिर्यादीच्या डाव्या पायाला व डाव्या हाताला मार लागला व फोरव्हिलर चालक तेथुन पळुन गेला. यातील नमुद आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे दुचाकी वाहनाला ठोस मारण्यास व जखमी होण्यास कारणीभुत आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अ्मरावती शहर अप क्र.४०२/२४ कलम २७९,४२७ भादवि | प्रविन नगर फिर्यादिचे राहते घर अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.२२/०४/२०२ ४चे १६.०० वा.ते २२.०० वा<br>माहीता<br>गु.दा.ता.वेळ दि.२२/०४/२०२४ ते २२.०० वा. | ए एस आय पंकज हरीदास सावळे ब.न.१२३३ पोस्टे मोर्शि अमरावती ग्रामिण | डिजे ट्रक क्र एं एच २७ एक्स २७४४ चा चालक नरेश नामदेवराव सरीसे वय-३८ रा. वलगाव | हकीकत अशा प्रकारे आहे की ,नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे आज नातेवाईक याची तब्बेत पाहण्या करीता आले होते त्यावेळेस मी माझी स्वीफ्ट गाडी क्र एम एच २७ बी ए ३२३४ ही घराच्या बाजुला ठेवली होती समोरून डिजे ट्रक क्र एं एच २७ एक्स २७४४ चा चालक हा भरधाव वेगाने आला व त्या ट्रक चालकाने माझे गाडीला ठोस मारली त्यामुळे माझे गाडीचे उजवे साइडचे दोन्ही गेट चपकले व माझे २०,००० रू नुकसान झाले तरी ट्रक चालक नामे नरेश नामदेवराव सरीसे वय-३८ रा. वलगाव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा ही विनंती अशा फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरची गुन्हा नोंद |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | नागपुरीगेट अप न. १५०/२० २४ कलम १४२ मपोका | लालखडी चौक अमरावती | दि. २२/०४/२० २४ चे १८. ३० वा ते १९.३० वा<br><br>दाखल दि.२२.०४. २०२४ चे १९.५० वा | सरतर्फे सपोनी अनंता ठाकरे पो स्टे नागपुरीगेट अमरावती शहर | शेख अकबर शेख हसन वय ४० वर्ष रा लालखडी चौक अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील सरतर्फे फिर्यादी व पो स्टाफ हे लालखडी भागात पेट्रोलिंग करित असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहिती मिळाली कि, तडीपार आरोपी नामे शेख अकबर शेख हसन वय ४० वर्ष रा लालखडी चौक अमरावती हा गंभीर दखलपात्र स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने लालखडी येथे चौक येथे उभा आहे अशा माहिती वरून पंच व पो स्टाफ बोलावुन नमुद घटनास्थळी गेले असता नमुद तडीपार ईसम हा सलुन चे दुकानासमोर मिळुन आला व त्याला ताब्यात घेवुन अमरावती शहरातुन तडीपार असतांना शहरामध्ये व पो स्टे हद्दीत प्रवेश केल्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणतेही समाधान कारक उत्तर दिले नाही सदर तडीपार ईसम हा मा पोलीस उपायुक्त परिमंडळ –१ यांचे आदेश क्र.पो बा ब/परि –१/तडीपार/४४७/२०२४ दि.०२.०४.२०२४ अन्वये ६ महिने करिता अमरावती तहद्दीतुन व अम ग्रामिण हद्दीतुन तडीपार असतांना विनापरवानगी मिळुन आला.त्याचे कृत्य कलम १४२ मपोका कायदा प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| ०३ | नागपुरीगेट अप न. १५१/२० २४ कलम १४२ मपोका | खुर्शिदपुरा अन्सार नगर अमरावती | दि. २२/०४/२० २४ चे २०. ४५ वा<br><br>दाखल दि.२२.०४. २०२४ चे २२.२९ वा | सरतर्फे पोहेका शंकर बावनकुळे ब न ७९ पो स्टे नागपुरीगेट अमरावती शहर | सैयद अल्तमश सैयद गफार वय २१ वर्ष रा खुर्शिदपुरा अन्सार नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील सरतर्फे फिर्यादी व पो स्टाफ यांची बिट मार्शल डयुटी असतांना पो स्टे परिसरात पेट्रोलिंग करिता असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहिती मिळाली कि, तडीपार आरोपी नामे सैयद अल्तमश सैयद गफार वय २१ वर्ष रा खुर्शिदपुरा अन्सार नगर अमरावती हा त्याचे घरासमोर फिरत अशा माहिती वरून पंच व पो स्टाफ बोलावुन नमुद घटनास्थळी गेले असता नमुद तडीपार ईसम हा त्याचे राहते घराजवळ फिरत असतांना मिळुन आला व त्याला ताब्यात घेवुन अमरावती शहरातुन तडीपार असतांना शहरामध्ये व पो स्टे हद्दीत प्रवेश केल्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणतेही समाधान कारक उत्तर दिले नाही सदर तडीपार ईसम हा मा पोलीस उपायुक्त परिमंडळ –१ यांचे आदेश क्र.पो बा ब/परि –१/तडीपार/४८८/२०२४ दि.०६.०४.२०२४ अन्वये १ वर्षाकरितता करिता अमरावती तहद्दीतुन व अम ग्रामिण हद्दीतुन तडीपार असतांना विनापरवानगी मिळुन आला.त्याचे कृत्य कलम १४२ मपोका कायदा प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

➢ अकस्मात मृत्यु:-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे वलगाव मर्ग क्र.15/2024 कलम 174 जा.फौ. प्रमाणे दाखल. | वलगाव | विनोद देविदास हिवराळे वय 40 वर्ष रा.वलगाव ता.जि.अमरावती. | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी यांनी दिनांक 21.04.2024 रोजी पो.स्टे.वलगाव येथे येवुन जबानी रिपोर्ट दिला की, त्याचे पती हे दिनांक 19.04.2024रोजी गावावरुन घरी परत आल्यावर ते घरुन निघुन गेले ते नेहमी दारु पिवुन राहत असत केव्हाही परत येत होते तर दि. 20.04.2024 रोजी 21.00 वा वानखडे यांचा फोन आला की, मृतक जुना बसस्टॉण्ड वलगाव समोरील रोडवर पडले आहे त्यावरुन आम्ही लगेच जावुन त्यांना पाहले ते पडलेले होते. त्यांना घरी आणले असता त्याचे हातपाय लुज पडलले होते. त्यामुळे त्यांना ईलाजा साठी इर्वीन दवाखाना अमरावती येथे नेले असता त्या ठिकाणी ते मरण पावले होते. त्याचे हया जबानी रिपोर्ट वरुन पो.स्टे.ला मर्ग दाखल |